# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ / आषाढ २४, १९४७ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### राज्यात नव्या सुधारित पीक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नसल्याबाबत

**(१) * ३४६८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.हेमंत पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.संजय केणेकर, श्री.विक्रम काळे, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील “एक रुपयात पीक विमा” ही योजना शासनाने बंद करुन नव्याने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित पीक विमा योजनेमध्ये नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान भरपाई यांसारखे महत्त्वाचे चार घटक वगळण्यात आले असून आता केवळ पीक कापणी प्रयोगाच्या आधारेच भरपाई देण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना विमा भरपाई मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आणि असंतोष निर्माण झाला असून शेतकऱ्यांना जाचक ठरणाऱ्या अटी समाविष्ट करण्यामागील कारणे काय आहेत, तसेच या नव्या योजनेचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी शासनाने वेगळी योजना किंवा पर्यायी भरपाई देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पीक वाढीच्या कालखंडात कमी/जास्त पाऊस, पावसात पडणारा खंड, कीड-रोगांचा प्रादुर्भाव अशा स्वरुपाच्या घटकांमुळे पीक उत्पादनात येणारी घट लक्षात घेवून संबंधित बाधित शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई देय आहे.

त्यानुसार राज्य शासनाने खरीप हंगाम २०२५ पासून नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, कीड रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी जोखीम बाबींच्या आधारे पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई बाधित शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून जे शेतकरी बाधित आहेत, केवळ अशाच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळून त्यांना पीक विमा संरक्षण मिळू शकेल.

या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खरीप हंगामातील पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या २% रब्बी हंगामातील पिकांसाठी १.५% व नगदी पिकांसाठी ५% विमा हप्ता आकारला जाणारा असून उर्वरित विमा हप्ता अनुदान म्हणून केंद्र व राज्य शासनामार्फत दिले जाणार आहे.

(३) सुधारित पीक विमा योजनेखेरीज वातावरण अनुकूल शेतीसाठी व शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासासाठी राज्यात शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी ‘‘कृषी समृद्धी योजना’’ राबविण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गौर (ता.पूर्णा, जि.परभणी) येथे अवैधरित्या गौण खजिनांचे उत्खनन होत असल्याबाबत

**(२)** * **२८६० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौर (ता.पूर्णा, जि.परभणी) येथे माँटो कार्लो कंपनीच्या स्टोन क्रशरद्वारे होत असलेल्या अवैध उत्खननामुळे जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर क्रशर बंद करण्याचे आदेश दिल्याचे तसेच जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या ना-हरकत परवानगीची मुदत संपली असतानाही सुमारे ४२ क्रशर अवैधरित्या सुरू असून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून अधिक प्रमाणात उत्खनन करीत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैधरित्या सुरु असलेल्या क्रशरमुळे होणाऱ्या प्रदूषण व पर्यावरणाच्या हानीबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही स्थानिक नायब तहसिलदार, महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचेमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यात सुरु असलेले अवैध क्रशर बंद करण्याबाबत तसेच क्रशरमुळे होणाऱ्या प्रदूषण व पर्यावरणाची हानीबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महसूल विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) परभणी जिल्ह्यातील ४२ स्टोन क्रशर यांच्या नाहरकत कालावधी समाप्त झालेला असल्याने स्टोन क्रशर बंद करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २४/०३/२०२५ अन्वये सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना दिला आहेत. मौजे गौर, ता.पूर्णा,

जि.परभणी येथे मे. माँटो कार्लो कंपनीचे स्टोन क्रशर अवैधरित्या सुरु असल्याचे तहसिलदार, पूर्णा यांच्या निर्देशनास आल्याने, सदर स्टोन क्रशर दिनांक २४/०३/२०२५ रोजी बंद केले होते.

परंतु, सदर स्टोन क्रशरला महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून Various size of stone, metal-१९०० ब्रास प्रतिदिन या उत्पादनाकरीता दिनांक २६/०३/२०२५ अन्वये संमतीपत्र (consent to operate) दिनांक १०/०२/२०२९ पर्यंत प्रदान केलेले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी परभणी यांनी दिनांक ०२/०४/२०२५ अन्वये दिनांक ०१/०४/२०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मे.मॉन्टो कॉर्लो कंपनीने परवानगीशिवाय जास्तीचे उत्खनन केल्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता मधील कलम ४८(७) व (८) जमीन अन्वये जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी २८,४९,७१, ०४४/- एवढ्या रकमेची दंडात्मक नोटीस बजावली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शबरी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरे मिळाली नसल्याबाबत

**(३) * ३०७१ श्री.एकनाथराव खडसे, श्री.सुनिल शिंदे, श्री.संजय केणेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धीरज लिंगाडे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीतील बेघर आणि गरजू लोकांसाठी पक्के घर बांधण्याकरीता मदत व्हावी या उद्देशाने राज्यात शबरी घरकुल योजना राबविण्यात येत असून सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत राज्यात २ लाख ४१ हजार ६७० शबरी घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट असताना केवळ १,८०,४८४ घरांना मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांकरीता राबविण्यात येत असलेल्या शबरी घरकुल योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये १ लाख २१ हजार १२५ घरकुलांचे उद्दिष्ट असताना ७७ हजार ९६८ घरकुले मंजूर झाली, सन २०२४-२५ मध्ये ८ हजार ७१३ घरकुलांपैकी माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत केवळ १ हजार ७१३ घरकुलांनाच मंजुरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शबरी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत प्रस्तावित निधी आणि प्रत्यक्ष वितरित निधीच्या तफावतीमुळे गेल्या तीन वर्षात राज्याच्या विविध जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांपैकी ६१ हजार १८६ आदिवासी कुटुंबाना हक्काची घरे मिळाली नसल्याची सन २०२४-२५ च्या महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालातून माहिती प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेसाठी दरवर्षी प्रस्तावित निधी आणि प्रत्यक्ष वितरीत निधी यामधील तफावत दूर करून योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करुन अनुसूचित जमातीतील बेघर आणि गरजू कुटुंबांना शबरी घरकुल योजनेंतर्गत हक्काचे घर मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीमध्ये २,४१,६७० उद्दिष्टांपैकी १,८७,५७४ घरकुले उद्दिष्टे मंजूर आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत सन २०२३-२४ मध्ये १,२१,१२५ उद्दिष्टांपैकी ८३०२७ घरकुल मंजूर आहेत. सन २०२४-२५ मध्ये ८७१३ उद्दिष्टांपैकी ३१८८ घरकुले मंजूर आहेत.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत आर्थिक वर्ष सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ पर्यंत प्राप्त २,४१,६७० उद्दिष्टांपैकी १,८७,५७४ घरकुलांना मंजूरी मिळाली असून ५४०९६ घरकुलांना मंजूरी देण्याची प्रक्रिया चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) येथे फणस संशोधन केंद्र स्थापन करण्यास मंजुरी देण्याबाबत

**(४) * २९५१ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांची गत ७-८ वर्षांपासूनची मागणी असलेले फणस संशोधन केंद्र हे कृषी विज्ञान केंद्र, लांजा (दापोली कृषी विद्यापीठ) येथे स्थापन करण्यास तांत्रिक मान्यता मिळालेली असून, अर्थसंकल्पीय तरतूद नसल्याने सदर प्रकल्प अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोपनकुर्शी यांच्यामार्फत सादर करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अंदाजे ४० कोटी रुपयांच्या खर्चासह तयार असून, सदर केंद्र स्थापन झाल्यास फणस प्रक्रिया मूल्यवर्धन, संशोधन तसेच शेतकऱ्यांना वैज्ञानिक मार्गदर्शन व प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण व आधुनिक तंत्रज्ञान आधारित फणस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यासाठी सदर केंद्राच्या स्थापनेस मंजुरी देऊन, कृषी विज्ञान केंद्र, लांजा (दापोली विद्यापीठ) येथे उक्त संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१), (२) व (३) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, लांजा येथे फणस संशोधन केंद्र स्थापन करणेबाबतचा रुपये ४० कोटी रकमेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

फणसाच्या मूल्यवर्धनासाठी तसेच, फणस उद्योगाला चालना देण्यासाठी फणस संशोधन केंद्रासंदर्भात मा.मंत्री,कृषी यांच्याकडे बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये स्वतंत्र फणस संशोधन केंद्र स्थापन करण्याऐवजी, विद्यापीठामध्ये स्वतंत्र प्रयोगशाळा स्थापन करण्याचा व त्याकरीता लागणाऱ्या उपकरणांसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार याबाबत दापोली कृषी विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाच्या जागेची बेकायदेशीररित्या विक्री करण्यात आल्याबाबत

**(५) * २९६३ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) येथे पाटबंधारे विभागाची पोटपाट लगत जागा खरेदी करुन त्याचे बेकायदेशीररित्या प्लॉटिंग करुन विक्री करण्यात येत असून, शासनाने भूखंड तुकडेबंदी केलेली असतानाही सदर प्रकरणी नियमाचे उल्लंघन करुन बनावट अहवाल तयार करुन जागांची विक्री होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोटपाट लगत जागेच्या विक्रीकरीता विजेचे खांबदेखील बेकायदेशीरपणे इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले असून, सदर बेकायदेशीर विक्री ही प्रांत, दुय्यम निबंधक, इरिगेशन विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने सुरु असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जागांची बेकायदेशीर संगनमताने विक्री करणाऱ्या प्रांत, दुयम निबंधक, इरिगेशन विभागाचे अधिकारी यांच्यावर तसेच अन्य संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

मौजे कोरेगाव, ता.कोरेगाव येथील गट क्रमांक १४६/२/२ एकूण क्षेत्र १/१३/५० हे. आर चौ.मी., पो.ख. ०.०० हे.आर चौ.मी. आकारणी २.१५ रुपये पै. इतके भोगवटादार वर्ग-१ धारणाधिकाराचे क्षेत्र आहे. सदर क्षेत्राच्या अधिकार अभिलेख सदरी इतर हक्कात धोम कालव्याकडे संपादीत करावयाचे क्षेत्र ०/०३/०० हे.आर चौ.मी. अशी नोंद आहे. सदरचे क्षेत्र जलसंपदा विभागाकडील धोम डावा कालव्यावरील मायनर ५० साठी संपादन झालेल्या क्षेत्रालगत आहे. गट क्र. १४६/२/२ मधील धोम डावा कालव्याकडे संपादीत करावयाचे क्षेत्र वगळून काही क्षेत्र विहीर, कुपनलिका व रस्ता याकरीता हस्तांतरण/विक्रीस उपविभागीय अधिकारी, कोरेगाव यांच्याकडून परवानगी देण्यात आल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

(३) यापूर्वी मा.विधानपरिषद सदस्य यांनी विधानपरिषदेमध्ये “विशेष उल्लेख” सूचना क्रमांक-२१८ उपस्थित केली होती. सदर विशेष उल्लेख सूचनेच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, कोरेगाव यांचे कार्यालयाकडून अल्पक्षेत्र विक्री बाबत देण्यात आलेल्या आदेशांची तपासणी करणे तसेच दुय्यम निबंधक कार्यालय, कोरेगाव यांचेकडे झालेल्या सर्व खरेदी-विक्री दस्तांची तपासणी करुन यामध्ये तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन होईल असे दस्त झाले किंवा कसे? याबाबतची तपासणी करणे याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांचे आदेश क्र.कुका/अधिअभि/-कावि १४१६/२०२५ Comp.No.१९४१८०५/२०२५, दिनांक १२/०६/२०२५ अन्वये अपर जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असून, तपासणी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) जवळील उल्हास व वालधुनी नदीपात्रात अतिक्रमण होत असल्याबाबत

**(६) * २८०४ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) जवळील उल्हास नदीपात्रात हजारो ब्रास मातीचा भराव टाकून नदीपात्र बुजविण्यात येऊन सिमेंटच्या भिंती उभारण्यात येत असतानाही संबंधित तहसिलदार व महसूल विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करित असल्याची तसेच वालधुनी नदीपात्रातही बांधकाम व्यावसायिकांनी अतिक्रमण करून बिझनेस सेंटर्स व गृहसंकुले उभारली असून सदर अतिक्रमणांविरोधातील तक्रारींची जिल्हाधिकारी दखल घेत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकाराबाबत पर्यावरण कार्यकर्त्या यांनी धरणे आंदोलन सुरू केल्याचे तसेच "मी कल्याणकर" संस्थेचे प्रमुख व माजी नगरसेवक यांनी त्याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असल्याचेही दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हास व वालधुनी या दोन्ही नद्यांच्या पात्रात झालेल्या अतिक्रमणांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील ग.नं ५६/२/३, ५९/१, ५९/२, ५९/४, ५९/५, ५९/६, ५९/७, ६५/१, ६५/३, ६५/४, ६५/५, ६५/८, ६५/१० व ६५/११ या क्षेत्रातुन मातीचे उत्खनन करून नदी पात्रात टाकत असल्याचे दिनांक २३/०४/२०२५ रोजी निदर्शनास आले आहे.

वालधुनी नदी पत्रात अंबरनाथ नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिकाक्षेत्रात अतिक्रमण करून कोणतेही बेकायदेशीर बांधकाम सुरू असल्याने निदर्शनास आलेले नाही.

(२) काही पर्यावरण कार्येकर्त्यानी दिनांक २८/०४/२०२५ रोजी धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(३) मौजे कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील ग.नं ५६/२/३, ५९/१, ५९/२, ५९/४, ५९/५, ५९/६, ५९/७, ६५/१, ६५/३, ६५/४, ६५/५, ६५/८, ६५/१० व ६५/११ या क्षेत्रातुन मातीचे उत्खनन करून नदी पात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले, त्यानुषंगाने दिनांक २४/०४/२०२५ रोजी निवासी नायब तहसिलदार, अंबरनाथ, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली असता, सदर जागेवर ८९१२ ब्रास माती उत्खनन, १६६ ब्रास दगड साठा व ८३ ब्रास दगड पावडर आढळून आले. त्याबाबतच्या गौण खनिजासाठी रुपये ०९,९३,६७,१४१/- व वापरण्यात आलेल्या यंत्र सामग्रीसाठी रुपये २२,५०,०००/- अशा एकूण रुपये १०,१६,१७,१४१/- एवढ्या दंडात्मक रकमेचे दिनांक १६/०५/२०२५ रोजी आदेश तहसिलदार, अंबरनाथ यांनी संबंधिता विरूध्द दिले आहेत. तसेच यामध्ये वापरण्यात आलेली यंत्र सामग्री जप्त करण्यात आली आहे.

संबंधिताना उल्हास नदीपात्रामध्ये अनधिकृत केलेला भराव/साठा काढून टाकून नदीपात्र पूर्ववत करण्याबाबत संबंधितास निर्देश दिले होते. परंतू संबंधितानी सदर भराव न काढल्याने त्यांच्याविरूध्द अंबरनाथ पोलीस स्टेशनला संबंधित संस्थे विरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७), आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ (बी) व भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३ कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

तसेच संबंधित संस्थेस उल्हास नदी पात्रात केलेला अनधिकृत भराव काढून संस्थेच्या जागेत टाकणेव नदीपात्र पूर्ववत करण्यास येणारा खर्चाचे देयक संबंधित संस्थेकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, अंबरनाथ यांनी दिनांक ०३/०६/२०२५ अन्वये मुख्यधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांना कळविले आहे. त्यानुषंगाने उल्हास नदी पात्रात अनधिकृतपणे केलेला भराव काढून टाकण्याची कार्यवाही मुख्यधिकारी, कुळगाव बदलापूर, नगरपरिषद यांच्याकडून सुरू आहे.

वालधुनी नदीच्या काठावर सुरू असलेल्या बेकायदेशीर बांधकामावर तहसिलदार, उल्हासनगर यांनी कार्यवाही केली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपुर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(७) * ३१०८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपल्ली (जि.चंद्रपूर) वनपरिक्षेत्रात तेंदूपत्ता तोडण्यास गेलेल्या एका महिलेचा वाघाच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ मे, २०२५ रोजी घडल्याची तसेच दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ११ मे, २०२५ या कालावधीत जिल्ह्यात वन्यजीवांच्या हल्ल्यांमुळे एकूण १६ जणांचा मृत्यू झाल्याचे व मागील पाच महिन्यांत एकूण २३ जणांचा वाघांनी बळी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात विशेषतः मूल तालुक्यात मानव-वन्यप्राणी संघर्ष वाढला असून, त्यात बहुतांश वेळा व्यक्ती मृत्यूमुखी पडत असल्याने अशा घटना रोखण्यासाठी तसेच वाघांच्या हल्ल्यांमध्ये जखमी किंवा मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) चंद्रपूर वनवृत्तांतर्गत चिंचपल्ली वनपरिक्षेत्रात दिनांक ११ मे, २०२५ रोजी सौ.विमल बुध्दाजी शेंडे ही महिला तेंदूपत्ता तोडण्याकरीता गेली असता वाघाने हल्ला करुन ठार केल्याची घटना निदर्शनास आली. महसूल व वन विभाग, अधिसूचना दिनांक ३०/०१/२०२४ अन्वये मृत व्यक्तीच्या वारसदारांना नुकसान भरपाईची तातडीची मदत रुपये १०.०० लक्ष अदा करण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाई रुपये १५.०० लक्ष अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ११ मे, २०२५ या कालावधीत मानव व वन्यजीव संघर्षात चंद्रपूर वनवृत्तांतर्गत एकूण १३ व्यक्ती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

(२) व (३) मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने वनवृत्तामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१) संवेदनशिल क्षेत्रात क्षेत्रिय कर्मचाऱ्यांद्वारे गस्त करण्यात येते.

२) गावातील सरपंच, पोलीस पाटील व नागरिकांची सभा घेवून वन्यप्राण्यांबाबत आवश्यक माहिती देण्यात येते.

३) संवेदनशिल गावात तेथील स्थानीक लोकांची निवड करुन PRT टिम तयार करून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांसह नियमीत गस्त करण्यात येते.

४) जंगलालगत शेती असलेल्या शेतकऱ्यांना संरक्षणाकरीता मुखवटे, बांबु स्टीक वाटप करण्यात आलेले आहे.

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०/०१/२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

-----------------

## सावरा-आसेगाव (ता.अकोट, जि.अकोला) मार्गावर अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(८) * २७७८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुका येथील सावरा–आसेगाव मार्गावर शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण विभागामार्फत सन २०१८–२०१९ मध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लागवड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत असलेल्या जागेवर करण्यात आलेली असून या भागातील सुमारे ५० पेक्षा अधिक वृक्ष महावितरण विभागाच्या कंत्राटदारांकडून अवैधरित्या तोडण्यात आले असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, अकोट यांनी दिनांक २६ मार्च, २०२५ व १ एप्रिल, २०२५ रोजी महावितरण विभाग, अकोट यांना पत्राद्वारे अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर गुन्हा दाखल करण्याबाबत कळविण्यात आले होते, परंतु महावितरणकडून अद्याप कोणतेही उत्तर अथवा प्रतिसाद प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामाजिक वनीकरण विभागामार्फत अकोट तालुक्यातील सावरा-आसेगाव मार्गावर लाखो रुपयांचा खर्च करून लावण्यात आलेल्या वृक्षांची अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्या कंत्राटदारांविरोधात तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) सामाजिक वनीकरण विभाग, अकोला अंतर्गत सन २०१८ मध्ये अकोट तालुक्यातील सावरा-आसेगांव मार्गावर २ कि.मी. लांबी मध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली होती. सदर रोपवन स्थळास मार्च २०२१ मध्ये ३ वर्ष पूर्ण झाल्याने सदर रोपवन स्थळ वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण, अकोट यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोट यांचेकडे दिनांक १०/०५/२०२१ रोजी हस्तांतरीत केलेले आहे.

(२) सद्य:स्थितीत समन्वय अधिकारी, MSKVY SIXTH SOLAR LIMITED AKOLA यांनी दिनांक ०५/०३/२०२५ अन्वये मौजा कौठा खु. ई वर्ग जमीन गट क्रमांक ७ एकूण क्षेत्र १९.०७५ एकर ता.अकोट जिल्हा अकोला मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे सुरु असून सदर ठिकाणी पोल वरुन विद्युत लाईन टाकण्याचे चालू असल्याने, सावरा-आसेगांव मार्गावर, रस्त्याचे कडेला असलेली झाडे अडचण करत असल्याने सदर वृक्षांच्या फांद्या काही प्रमाणात तोडण्याची परवानगी मिळण्यास विनंती केल्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) अकोला यांनी दिनांक २१/०४/२०२५ अन्वये रस्त्याच्या कडेला असलेल्या वृक्षांच्या फक्त फांद्या तोडण्याचीच परवानगी देण्यात आलेली होती.

(३) महावितरण कंपनी, अकोट यांना उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोट यांनी दिनांक २६/०३/२०२५ व दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पत्राव्दारे वृक्षतोडीबाबत कळविलेले होते.

(४) व (५) दिनांक २७/०६/२०२५ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) अकोला यांनी सावरा-आसेगाव मार्गावर अवैध वृक्षतोडीच्या घटनेच्या अनुषंगाने, प्रत्यक्ष मोका पाहणी केली असता, सावरा ते आसेगांव रोड लगत, आडजात प्रजातीचे वृक्षांच्या फांद्या, विद्युत वाहिनीस अडथळा निर्माण होत असल्याने समन्वय अधिकारी, MSKVY यांनी मागणी केल्याप्रमाणे दिलेल्या परवानगीस अनुसरुन कटाई केल्याचे आढळून आले. तसेच कटाई केलेल्या फांद्या जागेवरच पडून असल्याचे आढळून आले. सदर घटनेमध्ये कोणत्याही प्रकारची अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले नाही.

-----------------

## घोडबंदर (जि.ठाणे) येथील "रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्ट" च्या जमिनीच्या विक्री व्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(९) * २४१५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) मार्गावरील कासारवडवली आणि ओवळे येथील "प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्ट" च्या मालकीच्या जमिनीचे मुल्य रुपये एक हजार कोटी एवढ्या रकमेपेक्षा अधिक असताना तेथील ६४ एकर जमीन एका कंपनीला अत्यंत अल्प दरात विकण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार आरक्षण अंतिम होण्याआधीच जमिनी बाजारभावापेक्षा अत्यंत कमी दरात खरेदी केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेचा प्रारुप विकास आराखडा जाहीर करण्यात येण्यापूर्वी ट्रस्टमधील काही विश्वस्त, विकासक व शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने जमिनीचा रुपये ७१ कोटी एवढ्या रकमेचा विक्री व्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमीन व्यवहाराची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) रतनशी प्रेमजी ट्रस्ट तर्फे ट्रस्टी निखील आर. माखेचा व इतर यांच्याकडून मा.धर्मादाय आयुक्तांच्या दिनांक ०८/०७/२०२४ रोजीच्या पूर्वपरवानगीने ट्रस्टच्या मौजे-वडवली येथील जमीन स.नं.८२/२, ८३, ८४, ८५, ८६, ८७ एकूण क्षेत्र २७ एकर ०५ गुंठे जमिनीची फेनकिन इन्फोटेक एल.एल.पी. तर्फे भागीदार परेश नानजी ठक्कर व दिपक भेदा यांना दिनांक ०६/०९/२०२४ रोजीच्या नोंदणीकृत दस्तान्वये रक्कम रुपये ७५,०५,००,०००/- (अक्षरी पंच्याहत्तर कोटी पाच लाख) इतक्या किंमतीस विक्री करण्यात आली होती. सदर विक्री व्यवहाराच्या वेळी सदर जमिनीचे सन २०२४-२५ च्या वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार येणारे मुल्यांकन रक्कम रुपये ३५,५८,१२,०००/- इतके होते.

ठाणे शहराची विकास योजना दिनांक २२/११/१९९९ पासून अंमलात आलेली होती. तद्नंतर ठाणे शहराची सुधारित प्रारूप विकास योजना दिनांक १०/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू जमिनीपैकी स.नं. ८३, ८४, ८५, ८६, ८७ येथील क्षेत्र ९४,८६०.०० चौ.मी. शॅलो वॉटर पार्क-०३ या आरक्षणाने बाधित झाल्यामुळे फेनकिन इन्फोटेक एल.एल.पी. तर्फे भागीदार परेश नानजी ठक्कर व इतर यांच्याकडून दिनांक ०३/०२/२०२५ रोजीच्या नोंदणीकृत दस्तान्वये सदर जमीन टीडीआर च्या बदल्यात ठाणे महानगरपालिका ठाणे यांना हस्तांतरित करण्यात आली होती.

सदरहू जमिनीच्या उपरोक्त दोन्ही नोंदणीकृत व्यवहाराच्या अनुषंगाने फेरफार क्र.२४९६, दिनांक १०/०१/२०२५ व फेरफार क्र.२४९९, दिनांक ७/०२/२०२५ नोंदविण्यात आले होते.

दरम्यान उक्त हस्तांतरणाच्या अनुषंगाने श्री.अनिरुध्द निखील माखेचा यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.१९१५/२०२५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०७/०३/२०२५ रोजीच्या आदेशान्वये फेनकिन इन्फोटेक एल.एल.पी. व रतनशी प्रेमजी धर्मदाय ट्रस्ट तर्फे ट्रस्टी निखील रसिकलाल माखेचा यांच्यामधील जमीन विक्री व्यवहाराचे नोंदणीकृत दस्त तसेच मा.धर्मादाय आयुक्त-२ महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दिनांक ०८/०७/२०२४ रोजीचे आदेश रद्द केले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशांच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेने सदर विक्री व्यवहारातील टीडीआर हस्तांतरणाची कार्यवाही स्थगित केली आहे.

तसेच उक्त नमूद फेरफार क्र.२४९६ व फेरफार क्र.२४९९ च्या अनुषंगाने श्री.अनिरुध्द निखील माखेचा यांनी उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलामध्ये फेरफार क्र.२४९६ व फेरफार क्र.२४९९ रद्द करण्याबाबतचे आदेश दिनांक १५/०४/२०२५ रोजी पारित केले आहेत.

सद्य:स्थितीत मे.फेनकिन इन्फोटेक एल.एल.पी. यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक ०७/०३/२०२५ रोजीच्या आदेशाविरुध्द दाखल केलेल्या पिटीशन नं.९८३४/२०२५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/०४/२०२५ रोजी अंतरीम आदेश पारीत करुन "जैसे थे" परिस्थिती ठेवणेबाबत (Status quo) आदेश पारित केले असून सदर प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १४/०७/२०२५ रोजी आहे.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गतच्या मजुरांचे कोट्यवधी रुपयांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(१०) * २९६८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात 'मागेल त्याला काम, कामाप्रमाणे दाम' या तत्वावर आधारित रोजगार हमी योजना (मनरेगा) सुरू असून, योजनेचे सुमारे साडेचार कोटी रुपयांचे अनुदान थकीत असल्यामुळे योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सहा महिन्यांपासून २६,५२७ मजुरांचे अकुशल मस्टर पोटी ४ कोटी ६३ लाख ६७ हजार ४३७ रुपये तर कुशल पोटी १८ कोटी ७५ लाख १४ हजार ९१० रुपयांची अशी एकूण २३ कोटी ३८ लाख ८२ हजार ३४३ इतक्या रकमेची देयके निधी अभावी प्रलंबित असून, माहे मार्च, २०२५ उलटूनही सदर मजुरांना वेतन मिळालेले नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मनरेगा अंतर्गत मजुरांचे प्रलंबित वेतन तातडीने वितरित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

अकुशल (मजुरी) पोटी नांदेड जिल्ह्यातील मजुरांसह राज्यातील मजुरांना दिनांक २१ एप्रिल, २०२५ पर्यंत मजुरीची रक्कम अदा करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात मे व जून अखेर अकुशल १०० दिवसांआतील मजुरीकरीता रक्कम रुपये २.१८ कोटी मजुरी व रक्कम रुपये १८.७५ कोटी कुशल निधी प्रलंबित आहे.

सद्य:स्थितीत केंद्राचे रक्कम रुपये ८९०.०० कोटी १०० दिवसांआतील व राज्याचे १०० दिवसांवरील रक्कम रुपये १९८.०० कोटी मजुरीकरीता तसेच, केंद्र शासनाकडून कुशल खर्चाकरीता रक्कम रुपये ११८२.९५ कोटी व त्याच्या राज्य समरूप हिस्सा रक्कम रुपये ३९४.३२ कोटी प्राप्त झाले असून निधी वितरणाच्या प्रक्रियेत आहे.

(४) प्रश्न अद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थी व्यसनाधीन झाल्याबाबत

**(११) * ३४५३ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग, नागपूर यांनी शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, इंडियन डेंटल असोसिएशन, नागपूर यांचेतर्फे गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांतील २३ हजार ८० विद्यार्थ्यांची तपासणी केली असता ६ ते २१ वयोगटातील १२ हजार १०४ विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनाधीन असल्याचे तसेच दुसऱ्या टप्प्यातील तपासणीत साडेचार हजार विद्यार्थ्यांना मुखपुर्व कर्करोग झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर योग्य उपचार करुन त्यांना व्यसनमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) व (२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली, भामरागड व अहेरी प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या दरम्यान शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, इंडियन डेंटल असोसिएशन, नागपूर यांचे मार्फत शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची मुख तपासणी केली. प्रस्तूत तपासणी दरम्यान गडचिरोली प्रकल्पातंर्गत ७६९ विद्यार्थ्यांपैकी ३०४ विद्यार्थ्यांना पुर्व मुखकर्करोगाचे निदान झाल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले असून ७ विद्यार्थ्यांची शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे CO२ लेझर शस्त्रक्रिया करण्यात आली.

भामरागड प्रकल्प अंतर्गत १७७८ विद्यार्थ्यांपैकी ४८७ विद्यार्थी तंबाखू व्यसनाधीन झाल्याचे आढळले होते. सदर विद्यार्थ्यांचे दंत महाविद्यालयाकडून तपासणी करण्यात आली असता विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे गंभीर आजार आढळून आले नाही.

अहेरी प्रकल्प अंतर्गत २१६३ विद्यार्थ्यांपैकी १८९ विद्यार्थी प्रभावित असल्याचे आढळून आले. त्यामध्ये ५ विद्यार्थ्यांची पुर्व कर्करोगाचे लेझर निदान औषधोपचार करण्यात आले आहे.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना तंबाखू व्यसनाच्या दुष्परिणामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच ‘‘सर्च शोध ग्राम चातगांव’’ या संस्थेमार्फत आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात सन २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईची रक्कम वितरित करण्याबाबत

**(१२)** * **३५७७ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सन २०२२ मध्ये झालेल्या चक्रीवादळ व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीच्या नुकसानीसंदर्भात शासनाने नुकसान भरपाईची रक्कम मंजूर केलेली असूनही, सदर रक्कम अद्याप संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा न झाल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान भरपाईच्या रकमेच्या वितरणास विलंब होत असून सदर रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबतची मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात सन २०२२ मध्ये चक्रीवादळ व अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यात जून ते ऑगस्ट, २०२२ या कालावधीत शेतीपिकांचे झालेल्या नुकसानीकरीता शासन निर्णय क्रमांक सीएलएस २०२२/प्र.क्र.२९७/म-३, दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ अन्वये रायगड जिल्ह्यासाठी रुपये २०५.६२ लक्ष निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली असून सदर निधी संबंधितास वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच, ऑक्टोबर, २०२२ करीता दिनांक २१/२/२०२४ च्या शासन निर्णयाद्वारे रुपये ५६,३४,०००/- एवढा निधी रायगड जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी रायगड यांनी डीबीटी प्रणालीवर ४२,४८,०००/- एवढ्या निधीस मान्यता दिली असून त्यापैकी रुपये ४१ लक्ष एवढा निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला आहे.

उर्वरित राहिलेल्या शेतकऱ्यांची माहिती ई-पंचनामा पोर्टल वर अपलोड करण्याची कार्यवाही जिल्हापातळीवर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरसांगवी (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील लेंडी नदीपात्रातून अवैधरित्या रेती उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत

**(१३) * ३६३३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरसांगवी (ता.देगलूर, जि.नांदेड) येथील लेंडी नदीपात्रामध्ये रेती तस्करांकडून दिवसरात्र रेतीचे अवैधरित्या उत्खनन करुन वाहतूक सुरू असल्यामुळे नदीपात्र कोरडे होत असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रेती घाटांच्या लिलाव प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे तालुक्यातील एका ठिकाणी रेती उत्खननास परवानगी देण्यात आलेल्या काही खाजगी रेती केंद्रांमार्फत एकाच पावतीवर अन्य ठिकाणांहूनही मोठ्या प्रमाणात रेती तस्करी सूरू असून याकडे संबंधित शासकीय यंत्रणांकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधरित्या रेती उत्खनन व तस्करीप्रकरणी दोषी असलेल्या संबंधित रेती तस्कर व शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) देगलूर तालुक्यात एकाच पावतीवर अन्य ठिकाणाहुन रेती तस्करी सुरू असल्याची बाब तहसिलदार, देगलूर यांच्या निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## रामेश्वर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील आंबा संशोधन उपकेंद्रात कोणतेही नवीन संशोधन न झाल्याबाबत

**(१४) * ३६६० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या अखत्यारीतील रामेश्वर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील आंबा संशोधन उपकेंद्रात मागील दहा वर्षांपासून कोणतेही मूलभूत अथवा नवे संशोधन करण्यात आलेले नसून तसेच संशोधनाच्या नावाखाली इतर देशांतील अथवा संस्थांमधील आधीच प्रसिध्द झालेल्या शिफारसींचेच पुनरुत्पादन करून वेळ व निधी वाया घालविला जात असल्याची बाब सुराज्य अभियान संघटनेने मा.कृषी मंत्री यांना निवेदनाद्वारे दिनांक १७ मार्च,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची दखल घेऊन उपकेंद्राची सध्याची कार्यस्थिती जाणून घेण्यासाठी तसेच संबंधित समस्या सोडविण्यासाठी बैठक आयोजित करण्याचे निर्देश मा.कृषीमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपकेंद्रात मागील दहा वर्षांमध्ये आंबा संशोधनाव्यतिरिक्त इतर फळपिकांवरील प्रयोग सुरू असून आंबा विषयक संशोधन अद्याप प्रलंबित असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा उत्पादक व बागायतदारांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी स्थायी प्रदर्शन, तांत्रिक कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम यांचा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रामेश्वर (जि.सिंधुदुर्ग) येथील उपकेंद्रात मंजूर पदांपैकी सध्या किती पदे रिक्त असून कार्यरत पदापैकी किती पदे उपकेंद्रात कार्यरत आहेत तसेच आंबा संशोधन उपकेंद्र पुन्हा प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या आंबा संशोधन उपकेंद्र रामेश्वर, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील संशोधन कार्य व तद्नुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतदारांच्या समस्यांचे निराकरण करण्यासंदर्भात "सुराज्य अभियान" या संघटनेचे दिनांक १७/०३/२०२५ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) होय.

कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात मा.राज्यमंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०६/२०२५ रोजी बैठक संपन्न झाली.

(३) सद्य:स्थितीत आंबा संशोधन केंद्र, रामेश्वर येथे उद्यानविद्या विषयक ७ संशोधन प्रयोग आणि किटकशास्त्र विषयक ६ संशोधन प्रयोग सुरु आहेत. या संशोधन केंद्रामार्फत सन २०१४ ते सन २०२४ पर्यंत एकूण ३ शिफारशी देण्यात आल्या आहेत. या संशोधन केंद्रामध्ये उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा व इतर प्रयोगशाळा सुरु करण्याची बाब विद्यापीठ स्तरावर विचाराधीन आहे.

सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा उत्पादक व बागायतदारांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्यामार्फत वेळोवेळी शेतकरी मेळावे आयोजित करण्यात येतात. याखेरीज प्रशिक्षण/कार्यशाळा घेवून आंबा शेतकऱ्यांना मार्गदर्शन, तथा जनजागृती करण्यात येत आहे.

याशिवाय, आंबा पिकावरील कीड व रोगांच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने अनेक व्हिडीओ क्लिप्स विद्यापीठाच्या युट्यूब चॅनेलवर व फेसबुक या सोशल माध्यमावर अपलोड केल्या आहेत. सन २०२५-२६ या वर्षात विद्यापीठाकडून २०-२५ आंबा मोहोर संरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) रामेश्वर आंबा संशोधन उपकेंद्रासाठी एकूण १५ पदे मंजूर असून त्यापैकी ०८ पदे भरलेली आहेत. या उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून संशोधन केंद्राचे कामकाज प्रभावीपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला जातो.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतिबंध अद्ययावत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. आकृतिबंध अंतिम झाल्यावर शासनाच्या पदभरती विषयक धोरणानुसार रिक्त पदे भरण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील दिक्षाभूमीचा विकास आणि सौंदर्यीकरणाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ३९४१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नागपूर येथील दिक्षाभूमीला ‘अ’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन २०० कोटींचा विकास आराखडा तयार करुन निधी मंजूर केला असूनही पाहणीदरम्यान दीक्षाभूमीचे विकास व सौंदर्यीकरणाचे काम अद्यापही अपूर्ण असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिक्षाभूमीच्या विकास व सौंदर्यीकरणाची कामे सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

प्रस्तुत कामाचे ई-भूमिपूजन सोहळा मा.मुख्यमंत्री, यांचे हस्ते दिनांक २४/१०/२०२३ रोजी संपन्न होवून दिनांक २७/१०/२०२३ रोजी प्रत्यक्ष बेसमेंट पार्किंग प्रस्तावित अंदाजे २.५ एकर जागेमध्ये पायव्याच्या कामासाठी सरासरी ३ मी. चे खोदकामाचे काम सूरु करून टप्प्या-टप्प्याने सरंक्षण भिंत, व्यासपीठ, परिक्रमामार्ग इत्यादी कामे सूरू केलेली होती.

प्रकल्प स्थळी प्रकल्पातील भूमीगत बांधकामाविरूध्द तीव्र जनक्षोभ लक्षात घेता परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभूमी नागपूर समितीने दिनांक ०१/०७/२०२४ रोजी प्रकल्पातील भूमीगत उपक्रम रद्द करण्याची विनंती केली होती. सोबतच दिनांक ०१/०७/२०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री (गृह) महोदय यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन दरम्यान विधानसभेच्या सभागृहात दीक्षाभूमी परिसरात सुरू असलेल्या विकास कामास स्थगिती देवून प्रकल्पासंबंधी समिती सोबत बैठक आयोजित करून पुढील निर्णय घेण्यात येईल, अशी घोषणा केली होती.

(२) परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभुमी नागपूर यांच्या सोबत महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०७/२०२४ रोजी संपन्न बैठकीतील चर्चेनुसार दीक्षाभूमी परिसरात खोदकाम करण्यात आलेल्या जागेच्या सपाटीकरण व व्यासपीठाचे काम ना.म.प्र.वि.प्रा. द्वारे पूर्ण करण्यात येवून दिक्षाभुमी परीसर धम्मचक्र प्रवर्तन दिनी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सुस्थितीत हस्तांतरीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी लोकभावना लक्षात घेऊन सदर आराखड्यात फेर बदल करावयासाठी ना.म.प्र.वि.प्रा. मार्फत प्रस्तावित करण्यात येत आहेत. सुधारीत आराखड्यास प्रशासकीय अंतिम मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) * ४३५६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भात मागील वर्षभरात सुमारे २०० कारवायांमध्ये एकूण २०३ वाहने व ४ यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली असून संबंधितांवर रुपये ४ कोटी ६३ लाखांचा दंड आकारण्यात आल्याचे तसेच २९ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील १० तहसिल हद्दीत गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन, वाळू उपसा व वाहतूक यामध्ये सातत्याने वाढ होत असून सदर अवैधरित्या होणारी वाळू उत्खनन रोखण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊनही शासन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन आणि वाहतुकीबाबत मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्ह्यात जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय अवैध गौण खनिज प्रतिबंध पथके स्थापन करण्यात आली असून त्यांच्यामार्फत कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगल क्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

**(१७) * ४५३० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन १९६४ मध्ये अस्तित्वात असलेल्या सुमारे ९.२३ लाख हेक्टर क्षेत्र झुडपी जंगल क्षेत्रापैकी ६.५५ लाख हेक्टर क्षेत्राला संरक्षित किंवा आरक्षित वनभूमीचा दर्जा देऊन उर्वरित २.६८ लाख हेक्टरपैकी ९२,१२५ हेक्टर जमीन वनीकरणयोग्य म्हणून राखून ठेवण्यात आली व १.७६ लाख हेक्टरपैकी ८९,७६८ हेक्टर जमीन १९९२ पर्यंत वन क्षेत्राबाहेरील उपयोगासाठी वापरण्यात आली असून उरलेली ८६,४०९ हेक्टर जमीन कायदेशीर प्रक्रियेत अडकली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ डिसेंबर, १९९६ रोजीच्या न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने विदर्भातील सहा जिल्ह्यांतील झुडपी जंगल परिभाषित करण्याचे तसेच महसूल खात्याच्या अखत्यारीतील अशा जमिनी खाजगी व्यक्ती अथवा संस्थांच्या ताब्यात गेल्या आहेत काय याबाबतची पडताळणी करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथक गठित करण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरक्षित झुडपी जंगल क्षेत्रावर १९८० नंतर झालेली अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समिती गठित करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०५/२०२५ रोजीच्या आदेशास अनुसरून करावयाची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीक नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये कपात केल्याबाबत

**(१८) * ४४७० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने पीक नुकसानीसाठी दिली जाणारी मदतीची मर्यादा दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार केवळ दोन हेक्टरपर्यंत मर्यादित करण्यात आली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार तिन्ही प्रकारच्या पीक नुकसानीसाठी प्रति हेक्टर जाहीर करण्यात आलेल्या मदतीच्या रकमेच्या तुलनेत सद्य:स्थितीत करण्यात आलेली कपात लक्षणीय असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन हेक्टरपर्यंतच मर्यादा लागू केल्यामुळे ३ ते ५ हेक्टरपर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीपासून वंचित राहावे लागणार असून नैसर्गिक आपत्तींमुळे सातत्याने नुकसानीस सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा कमी रक्कम मिळाल्याने त्यांचे कर्ज फेडणे शक्य न झाल्यास आत्महत्याचे वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पीक नुकसान भरपाईसंदर्भात दिनांक २७ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयाचे संभाव्य दुष्परिणाम विचारात घेऊन शासन पुनर्विचार करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) राज्य शासनाने नैसर्गिक आपत्तीमध्ये होणाऱ्या नुकसानीबाबत आपतग्रस्तांना द्यावयाच्या मदतीबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २७/०३/२०२३ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे मदतीचे दर विहित केलेले आहे. प्रस्तुत निकष व दरानुसार निविष्ठा अनुदान देण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत. त्याअनुषंगाने खरीप २०२५ पासून राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे अतिवृष्टी/पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

----------------

## राज्याच्या वाळू धोरणात बदल करण्याबाबत

**(१९) * ४५१४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या वाळू धोरणात राज्यातील उपलब्ध वाळू साठा व त्यासंबंधित मागणी यांचा समावेश करण्यात आल्या नसल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू उपशासाठी कोणतेही निश्चित मापदंड नसून परवानगी प्रक्रिया केवळ महसूलावर आधारित असल्यामुळे राज्यात वाळू उपसाबंदीची शक्यता निर्माण झाली असल्याचे तसेच वाळू खरेदी-विक्रीसाठी स्वतंत्र पोर्टल, वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा, वाळूचे ऑनलाइन व ऑफलाइन बुकिंग, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाळूचा पुरवठा तसेच वाळू लिलावाचे अधिकार आदिवासी संस्थांना देणे या महत्त्वाच्या बाबी धोरणात समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उपलब्ध वाळू साठा व त्यासंबंधित मागणी इत्यादी वस्तुस्थिती लक्षात घेऊन जाहीर केलेल्या वाळू धोरणात सुधारणा करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबीय कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून त्यामध्ये विविध स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारी वाळू विकास कामांसाठी तसेच, नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने तरतूदी केल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, आदेश तसेच, मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश तसेच, Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining, २०२० मधील तरतुदीनुसार वाळूचे उत्खनन, वाहतूक करण्यात यावी अशा तरतूदी धोरणात केल्या आहेत.

वाळू उत्खननासाठी परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामांसाठी तसेच, नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी, नदीपात्रात वाळू साठल्याने आजूबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये हा प्रमुख उद्देश सदर धोरणाचा आहे.

सदर धोरणानुसार वाळूची विक्री लिलावधारक/परवानाधारक यांच्यामार्फत होणार असल्याने वाळू खरेदी-विक्रीसाठी स्वतंत्र पोर्टल व ऑनलाईन विक्री करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळू गटामधून वाळूची नोंदणी महाखनिज या ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदवून लाभार्थ्याला वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली आहे. तसेच, अवैध वाळू उत्खननास आळा घालण्याच्या अनुषंगाने वाळू गटाचे Geo-fencing करणे, वाळू गटाचे संपूर्ण छायाचित्रण करण्यासाठी आवश्यक CCTV बसविणे व वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास GPS असणे बंधनकारक आहे.

पात्र लिलावधारक यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १० टक्के वाळू तसेच, स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळू गटामधून उपलब्ध होणारी वाळू प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी उपलब्ध करुन देण्याची तरतूद धोरणामध्ये केली आहे.

वाळू धोरणानुसार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणारी व्यक्ती व ज्या आस्थापनेचे नोंदणीकृत मुख्यालय अथवा शाखा महाराष्ट्रामध्ये आहे अशी संस्था लिलावामध्ये भाग घेऊ शकते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * ३९७८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत तीन वर्षात उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढले असून जळगाव जिल्ह्यात सावकारांच्या जाचामुळे, नापिकी, कर्जबाजारीपणामुळे ३८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे व धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या तुलनेत सदर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या आकडेवारीच्या प्रमाणात तिप्पट वाढ झाल्याचे दिनांक ११ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तसेच आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २३/०१/२००६ अन्वये (१) नापिकी, (२) राष्ट्रीयकृत बँक/सहाकारी बँक किंवा मान्यता प्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व (३) कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष इतकी मदत देय आहे.

शेतकरी आत्महत्या प्रकरणी पात्र कुटूंबियांना रुपये १.०० लक्ष प्रमाणे मदत देण्यात आली असून, उर्वरित प्रकरणी तपासणी करून मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. कृषी विभागामार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत रुपये ६,०००/- आणि नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत रुपये ६,०००/- असे एकूण रुपये १२,०००/- वार्षिक अनुदान देण्यात येत आहे.

२. शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे व समुपदेशन केंद्रे संचलित करणे इ. योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.

३. याशिवाय, शासन निर्णय दिनांक २४/०७/२०१५ अन्वये विविध विभागामार्फत उपाययोजना राबविण्यात येत असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना लाभ देण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संत्रा फळावर फायटोप्थोरा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(२१) * ३०१६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे १.५ लाख हेक्टर क्षेत्रावर संत्रा लागवड केली जात असून त्यापैकी सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र अमरावती जिल्ह्यात, २५ हजार हेक्टर क्षेत्र नागपूर जिल्ह्यात आणि उर्वरित २५ हजार हेक्टर राज्यातील इतर भागांमध्ये होत असून नागपूर व अमरावती जिल्ह्यातील विशेषतः चांदूरबाजारसह इतर तालुक्यांमध्ये सुमारे ४०% बागांवर फायटोप्थोरा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याचे दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, संत्रा पिकांमधील फायटोप्थोरा या बुरशीजन्य रोगाचा रोगप्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषी विद्यापीठ तसेच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

कीड व रोगांच्या क्षेत्रिय यंत्रणेमार्फत करण्यात आलेल्या संत्रा पिकाच्या सर्वेक्षणामध्ये फायटोप्थोरा या रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर झाला असल्याचे आढळून आलेले नाही.

(२) फळ पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) हा नागपूर व अमरावती विभागात संत्रा या पिकासाठी राबविण्यात येतो. या अंतर्गत क्षेत्र निरीक्षणांच्या आधारे आर्थिक नुकसान पातळीच्या वर असलेल्या भागात शेतकऱ्यांना वेळीच मार्गदर्शन केले जाते.

याशिवाय, गावसभा, प्रशिक्षण, शेतीशाळा, भित्तीपत्रिका, एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## “एक रुपयात पीक विमा” योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२२) * ४२०८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान पीक विमा योजनेत बदल करून शासनाने सुरू केलेल्या “एक रुपयात पीक विमा योजना” या योजनेमुळे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य शासनाच्या तिजोरीवर सुमारे ६,००० कोटी रुपयांचा भुर्दंड पडल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत पीक विम्याच्या अर्जांमध्ये दुप्पटीने वाढ झाल्याचे तसेच काही प्रकरणांमध्ये बनावट अर्ज सादर करून शासनाची फसवणूक करत पीक विम्याचे अनधिकृत लाभ घेण्याचे प्रकारही घडल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर पडलेल्या आर्थिक भाराच्या पार्श्वभूमीवर “एक रुपयात पीक विमा योजना” रद्द करून पुर्वीचीच “पंतप्रधान पीक विमा योजना” पुन्हा सुरू करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरीप हंगाम २०२५ मध्ये पीक विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी कोणते निकष निश्चित केल्याचे तसेच शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) सन २०२३ च्या खरीप हंगामापासून शेतकऱ्यांकडून केवळ रुपये १ एवढे शुल्क घेवून, सर्वसमावेशक पीक विमा योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०२३-२४ या वर्षात राज्य शासनावर एकूण रुपये ७९७५ कोटी इतका आर्थिक भार पडला आहे.

(२) सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ च्या खरीप हंगामात अर्जसंख्या ही दुप्पटीने, तर रब्बी हंगामात अर्जसंख्या १० पटीने वाढल्याचे निदर्शनास आले. तसेच, बनावट/गैरप्रकारे अर्ज करण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले.

(३) सदर सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करण्यात आला असून, खरीप २०२५ पासून पीक कापणी प्रयोगांवर आधारित, "सुधारित पीक विमा योजना" राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.
(४) राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी खरीप, २०२५ आणि रब्बी, २०२५-२६ या हंगामांकरीता पीक उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने दिनांक २४ जून, २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे सविस्तर कार्यपध्दती विहित केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात अमृत सरोवर योजनेंतर्गत मुरुम उत्खननामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२३) * ३९२७ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील "आजादी का अमृत महोत्सव" मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये अमृत सरोवर (शेततळे) निर्माण करून सदर योजनेतून निघालेला मुरुम महसूल, जलसंधारण व रेल्वे विकास निगमचे अधिकारी यांच्या संगनमताने विनामोबदला लोहमार्ग व महामार्ग प्रकल्पाच्या कंत्राटदारांना पुरविण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोहमार्ग प्रकल्प राबविणाऱ्या कंपनीस अमृत सरोवर योजनेतून निघालेला मुरुम मोफत नेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत परवानगी देण्यात आली असून सदर कंपनीने परवानगीच्या अटींचा भंग करून अतिरिक्त हजारो ब्रास मुरुम उत्खनन करुन वाहून नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही प्रकारणात शेतकऱ्यांच्या शेतात सरोवर निर्माण न करता माळरान अथवा टेकडीच्या भूभागावर अमृत सरोवर मंजूर करण्यात आले असून निर्धारित २ मीटर खोलीच्या मर्यादेपेक्षा २० ते ३० मीटरपर्यंत अनधिकृत खोदकाम करण्यात आले असून सदर प्रकरणी लहुजी शक्ती सेनेच्यावतीने उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, हदगाव यांच्याकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे चौकशीची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आजादी का अमृत महोत्सव या मोहिमेअंतर्गत अनधिकृतरित्या उत्खनन करुन हजारो ब्रास मुरुम वाहून नेल्याप्रकरणी संबंधित कंपनीवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यामध्ये Package-IV अंतर्गत यवतमाळ नांदेड या नवीन ब्रॉडगेज लाईन km.२०७ to २५३ चे कामासाठी रेल्वे विकास निगम लिमिटेड यंत्रणेमार्फत नियुक्त कंत्राटदार PMPL-RSVCPL JV, Hyderabad (Telangana) यांना केंद्र शासनाच्या आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत मौजे मनाठा येथील ग.नं. २९०, मौजे कवाना येथील ग.नं.१२, मौजे पांगरी येथील ग.नं.९७ व मौजे कार्ला येथील ग.नं.१४० मधील शेततळे निर्मितीस एकूण ४७,४०० ब्रास उत्खनन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) सदर कंपनीकडून परवान्याचे उल्लंघन करून हजारो ब्रास मुरूमाचे उत्खनन केले आहे अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) नाही. अशा प्रकारचे निवेदन तहसिलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) व (५) उक्त क्षेत्रामध्ये केंद्र शासनाच्या आझादी का अमृत महोत्सव सरोवर अंतर्गत नवीन शेततळे निर्माण करून त्यामाध्यमातून उपलब्ध होणारा विनामुल्य मुरूम याबाबत देण्यात आलेल्या परवानगी आदेशाच्या सर्व उत्खनन स्थळांची ईटीएस मोजणी करण्याचे निर्देश दिलेले असून, मोजणीअंती संबंधित कंत्राटदाराने अतिरिक्त उत्खनन केल्याचे आढळून आल्यास त्याच्याकडून स्वामित्वधन वसूल करण्यात येईल.

-----------------

## आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांतील गैरव्यवहारामध्ये दोषी ठरलेल्या खाजगी संस्थांना काळ्या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(२४) * ४४१० श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या सन २००४ ते २००९ या कालावधीतील विविध योजनांच्या अंमलबजावणीत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी न्या.एम.जी.गायकवाड समितीने केलेल्या शिफारसीनुसार काळ्या यादीत टाकलेल्या १०५ खासगी पुरवठादार संस्थापैकी ३४ संस्थांना काळ्या यादीतून बाहेर काढण्याचा धक्कादायक निर्णय आदिवासी विकास विभागाने दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी दोषी आढळलेल्या १०५ खासगी पुरवठादार संस्थापैकी ३४ खाजगी पुरवठादार संस्थांना काळ्या यादीतून बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून, सदर संस्थांनी त्यांच्या पुरवठा कालावधीत केलल्या गैरव्यवहाराबाबत त्यांच्याकडून किती रक्कमेची वसूली करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदरहू संस्थाना काळया यादीतून बाहेर काढण्याकरीता कोणते निकष लावण्यात आले आहेत तसेच काळया यादीतून बाहेर काढण्यासाठी गैरप्रकार करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) दिनांक २६ मे, २०२५ च्या आदेशान्वये ३४ संस्थांना काळया यादीतून वगळण्यात आले आहे.
(२) ३४ खाजगी पुरवठादार संस्थांपैकी ५ संस्थांकडून रुपये ३,८४,७४५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित २९ संस्थांचे FIR प्रकरणात अ/क समरी अहवाल न्यायालयात दाखल झाला असून योजना राबविल्याबाबत पूर्ण दस्तऐवज उपलब्ध आहेत. त्यामुळे उर्वरीत २९ संस्थांची वसूल पात्र रक्कम निरंक आहे.

(३) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी तपासणीअंती ज्या संस्थाबाबत योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या केल्याचे दिसून आले, वसूली निरंक आहे किंवा वसूलपात्र रकमेची वसूली झाली, FIR बाबत न्यायालयात अ/क समरी अहवाल दाखल झालेला आहे अशा संस्थाना काळ्या यादीतून वगळण्याची शिफारस शासनास केली होती. सदर शिफारस शासनाने स्विकारुन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून ३४ संस्थाना काळ्या यादीतून वगळलेले आहे.

सदर ३४ संस्थाना काळ्या यादीतून वगळण्यात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळू उपलब्ध करून देण्याबाबत

**(२५) * ४४७३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना व इतर योजनेंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू उपलब्ध न झाल्यामुळे घरांचे बांधकाम रखडल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी, वाळू पुरवठा व्यवस्थेतील अडचणी, निविदा प्रक्रियेतील विलंब किंवा अधिकृत वाळू उपसास्थळी वाळू उपलब्ध नसणे या कारणांमुळे घरकुल योजनांच्या अंमलबजावणीस अडथळा ठरत असल्याने तसेच वाळूच्या टंचाईमुळे मंजूर घरांचे बांधकाम वेळेत न होऊ शकल्याने लाभार्थ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळू उपलब्धतेसंदर्भातील अडचणी दूर करून मंजूर लाभार्थ्यांना वेळेत वाळू पुरवठा व्हावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यात सुरु असलेल्या वाळू डेपोमधून घरकूल लाभार्थ्यांना प्राधान्याने वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, ज्या वाळू डेपोची मुदत संपलेली आहे. तथापि, डेपोमध्ये विक्रीसाठी वाळू शिल्लक आहे अश्या वाळूडेपोमधील ५०% वाळूसाठा हा घरकुलासाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

शासनाच्या दिनांक ०८/०४/२०२५ व दिनांक ३०/०४/२०२५ च्या धोरणातील तरतुदीनुसार घरकुल लाभार्थी व स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण १०० वाळूगट गट निश्चित केले असून त्यात ३,४१,३५० ब्रास इतका वाळूसाठा उपलब्ध आहे. त्यामधून घरकुल व स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करून देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात पर्यावरण अनुमती प्राप्त तथापि, लिलावात न गेलेले १२ वाळूगट असून त्यामध्ये एकूण ४७,१३३ ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे. सदरचा वाळूसाठा प्राधान्याने घरकुल व स्थानिक वापरासाठी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

दिनांक ०८/०४/२०२५ ते दिनांक ०९/०६/२०२५ पर्यंत एकूण ३५४४ घरकुल लाभार्थ्यांना १२,६५६ ब्रास वाळू उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे मत्स्यालय उभारण्याबाबत

**(२६) * ४४२७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मत्स्य पर्यटन वाढीसाठी राष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याचे नियोजन मत्स्यव्यवसाय विभागामार्फत करण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या परिसरातील जागा मत्स्यालयासाठी निश्चित करण्यात आली असून यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांनी प्रशासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात मत्स्य पर्यटन वाढीसाठी राष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याच्यादृष्टीने शासनानाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नागपूर शहरात मत्स्यपर्यटनास चालना मिळण्यासाठी गोरेवाडा-नागपूर प्राणी संग्रहालयाच्या जागेची पाहणी करून येथे मत्स्यालय स्थापण्यासाठी जागेच्या उपलब्धतेची तपासणी करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.

(३) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी गोरेवाडा प्राणीसंग्रहालयास प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थापक, गोरेवाडा प्राणीसंग्रहालय, नागपूर यांच्याशी केलेल्या चर्चेमध्ये त्यांनी संग्रहालय परिसरात मत्स्यालयासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. जागेची उपलब्धता, शाश्वत पाणीपुरवठा आणि भविष्यातील पर्यटन विकासाची संधी तसेच नागपूर शहरात उपलब्ध होणाऱ्या जागेचा सर्वकष विचार करता, गोरेवाडा प्राणीसंग्रहालय, नागपूर येथे उभारणे समुचित आहे.

व्यवस्थापकीय संचालक, बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय, गोरेवाडा, नागपूर यांनी सदर प्राणीसंग्रहालयात मत्स्यालयाच्या प्रकल्पाकरीता ५००० चौ.मी. = १.२५ एकर राखीव असल्याचे तसेच प्रकल्पाचा आराखडा, खर्च अंदाजपत्रक व त्याची पूर्तता करण्यासाठी निधीची उपलब्धता, प्रकल्प बांधकामाची कार्यपध्दती याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. यानुसार प्रकल्पाचा अंदाजित आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी संयुक्तरित्या या क्षेत्रातील तज्ञ तसेच याविषयी काम

केलेल्या अनुभवी व्यक्ती व वास्तुविशारद यांची भेट घेतली. तसेच स्थळपाहणी करण्यात आली आहे. मत्स्यालय उभारणीबाबत आधुनिक कल्पना विचारात घेऊन मत्स्यालयाचा प्राथमिक आराखडा व अंदाजित खर्च याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील खदानीमध्ये पाण्यात बुडून व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत

**(२७) * ४३९६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरवट (ता.हदगाव, जि.नांदेड) येथे दोन मुलींसह एका महिलेचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडलेली असताना गारगव्हाण (ता.हदगाव) येथे अनधिकृत उत्खननामुळे निर्माण झालेल्या खदानीत पाण्यात बुडून दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैधरित्या उत्खननामुळे निर्माण झालेल्या खदानीच्या चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या तरुणांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मौजे वरवट गावातील तीन व्यक्ती मौजे वरवट गावाच्या शेजारी चुचां पांदन रस्त्यावर असलेला नाला ओलांडून येत असताना अतिवृष्टीमुळे अचानक नाल्याचे पाणी वाढल्याने पाण्याच्या प्रवाहाची गती व पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाण्याच्या प्रवाहात दिनांक २७/०५/२०२५ रोजी वाहत जावून तिघे मयत झाले आहेत. सदर मयत व्यक्तीच्या वारसांना नैसर्गिक आपत्तीमध्ये मयत झाल्यामुळे निराधार अर्थसहाय्य/सानुग्रह अनुदान म्हणून तहसिलदार, हदगांव यांनी प्रत्येकी चार लाख रूपये मंजूर केले आहेत.

मौजे गारगव्हाण येथील ग.नं.८७ मध्ये परवानगी दिलेल्या उत्खननाच्या खदानीमध्ये साचलेल्या पाण्यात पाय घसरून पडल्याने बुडून दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यानुषंगाने पोलीस स्टेशन मनाठा, ता.हदगांव येथे दिनांक ३०/०५/२०२५ रोजी आ.मू.क्र.००१४/२०२५ व क्र.००१५/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मृत्यू पावलेल्या एका व्यक्तीच्या वारसांना मदत मिळण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना व अन्य व्यक्तीच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणीमुळे योजनांच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(२८) * ४४७७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत विविध पिकांच्या अनुदानित बियाण्यांसाठी व पीक प्रात्यक्षिकांसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत महाडीबीटी पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक शेतकरी, शेतकरी गट व सहकारी संस्था अर्ज सादर करू न शकल्याने सदर योजनांच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाडीबीटी पोर्टल सतत बंद राहणे, गावपातळीवर अपुरी इंटरनेट सेवा तसेच तालुक्याच्या ठिकाणी देखील पोर्टल न उघडणे यामुळे अर्ज भरण्यास विलंब, पोर्टलची कार्यक्षमता व अपुऱ्या तांत्रिक पायाभूत सुविधा असल्याने शेतकऱ्यांचा वेळ व पैसा जाऊन मानसिक त्रास होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाडीबीटी पोर्टलवर तांत्रिक अडचणी दूर करुन शेतकऱ्यांना अर्ज सुलभपणे भरता यावा यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत सोयाबीन व भुईमूग पिकाचे १००% अनुदानावरील प्रमाणित बियाण्यासाठी शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी प्रणालीद्वारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वाने केलेली आहे. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियानांतर्गत महाबीजच्या विक्रेत्यांमार्फत अनुदानित बियाण्याचे शेतकऱ्यांना थेट वितरण करण्यात आले आहे. शेतकरी ओळख क्रमांकाशी सांगड घालून तसेच लॉटरी ऐवजी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर कृषी विभागाच्या विविध योजनांचा शेतकऱ्यांना महाडीबीटी प्रणालीद्वारे लाभ देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार पीक प्रात्यक्षिक प्रणालीमध्ये शेतकरी गटांसाठी आवश्यक बदल करण्यात आले परंतु, काही कालावधीकरीता प्रणालीमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज करतेवेळी अडचणींना सामोरे जावे लागले व परिणामी कमी प्रमाणात अर्ज प्राप्त झाले. सबब, हंगाम तोंडावर आल्याचे लक्षात घेता व पोर्टलच्या तांत्रिक समस्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून या दोन्ही योजनांतर्गत शेतकरी गटांचे जे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर प्राप्त झाले होते त्यांची निवड करण्यात आली तसेच, शिल्लक लक्षांकासाठी स्थानिक पातळीवर शेतकरी गटांचे थेट अर्ज स्वीकारून निवड करण्यात आलेली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यास दिलेल्या बहुतांश लक्षांकासाठी शेतकऱ्यांची व शेतकरी गटांची निवड पूर्ण होऊन बियाण्याचे प्रत्यक्ष वितरण झालेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.